
MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात



बीड(१६) वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने वंचित समूहाच्या विविध मागण्यांसाठी भव्य निदर्शने आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे आयोजित करण्यात आले . व्यैयक्तिक लाभासाठी ग्रामसभेच्या ठरावाची अट रद्द करावी . बीड जिल्ह्यामध्ये ओटीएसपी, विशेष घटक योजना, अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत लाभार्थ्यांना वेगवेगळ्या योजनेचा लाभ दिला जातो यासाठी ग्रामसभेच्या ठरावाची अट बंधनकारक केलेली आहे सदरील अट रद्द करावी, रमाई आवास योजना ग्रामीणच्या अनुदानामध्ये ५ लाख पर्यंत वाढ करण्यात यावी या व इतर मागणीसाठी येत्या १३ फेब्रुवारी २०२५ रोजी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष मा.अजय सरवदे यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे वंचित बहुजन आघाडी बीडच्या वतीने भव्य निदर्शने करत आंदोलन करण्यात आले . या आंदोलनात बीड जिल्हा पदाधिकारी ज्ञानेश्वर कवठेकर गोट्या वीर अनुरथ वीर भारत तांगडे सचिन मेघडंबर धम्मानंद साळवे अंकुश साळवे अर्जुन जौंजाळ रोहन मगर अन्वर सय्यद रहेमत खान महिला जिल्हाध्यक्ष अनिता चक्रे पुष्पा चक्रे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख राजेशकुमार जोगदंड यांच्या सह युवक आघाडी पदाधिकारी, महिला आघाडी पदाधिकारी, शहर पदाधिकारी, सम्यक विद्यार्थी आंदोलन पदाधिकारी, वंचित बहुजन आघाडी माथाडी कामगार पदाधिकारी व सर्वच वंचित बहुजन आघाडी विंगचे आजी–माजी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होते .

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –१५३ | सोमवार दि.१७ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -153 | MONDAY DT.17 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# अजितदादा संदीप भैय्या एमजेपीचे खराटे, न. प सिओ अंधारेना हटवल्याशिवाय बीडकरांना पाणी मिळणार नाही!







बीड / प्रतिनिधी

बीड नगर परिषदेच्या हद्दीमध्ये बीड करांना १५ ते २० दिवस पाण्याची वाट पाहावी लागते १२७ कोटी ची योजना ही मे. प्रगती कंट्रक्शनच्या घशात घालून एमजीपी मोकळी झाली आहे. याला बीड नगर परिषदेच्या सिओ नीता अंधारे ची जबाबदार आहेत बीड शहरातील अनेक भागांना पाणी येत नसताना सुद्धा एमजीपीच्या लोकांना हाताशी धरून नीता अंधारे यांनी व एमजीपीच्या पदाधिकाऱ्यांनी कोट्यावधी रुपयाचा निधी म्हणजेच १०२ कोटी रुपयांचा निधी हा मागणी नावाच्या प्रगती कंट्रक्शनच्या घशात घातलेला आहे. आता ती योजना फस्त झालेले आहे. अजित दादा बीड करांना पाणी पाजायचे असेल तर पहिल्यांदा मे. प्रगती कंट्रक्शन एमजीपी कार्यालय बीड छत्रपती संभाजीनगर येथील अधिकारी लोलापोड दीपक कोळी व बीड येथील एमजीपी कार्यालयातील गजानन खराटे एमजीपीचे सय्यद हर्षद एमजी पठाण एम एस वाघ के बी चिवरे बीड नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी नीता अंधारे पाणीपुरवठा योजनेचे बीड न. प माने यांच्यासह बीड जिल्ह्यामधील सुमारे एमजीपी कार्यालयातील ५०० कोटीच्या व बीड नगर परिषदेमधील कोट्यावधी रुपयांच्या पाणी प्रश्नावर ती आपण एकदा बीड नगर परिषदेच्या सिओनीता अंधारे गजानन खराटे यांना हटवल्याशिवाय बीडला सुरळीत पाणीपुरवठा होऊ शकत नाही कारण दोघेही अंधारे व खराटे हे एम जी असेल किंवा बीड नगरपरिषद मधील अधिकारी असतील हे टक्केवारी मध्ये मिदे झालेले आहेत. आणि मे. प्रगती कंट्रक्शन च्या सर्वेस्वार माकणे याला प्रत्येक रिपोर्ट फोनवरती देत आहेत त्यामुळे यांचा अगोदर बंदोबस्त करा नंतरच बिडकारांना पाणी पाजा यासाठी आ. संदीप भैय्यांची भेट घेणार असून आमदार संदीप भैया शिरसागर यांनी एमजेपी कार्यालयातील अधिकारी कर्मचाऱ्यांची एक बैठक म्हणून त्यामध्ये एमजीपी कार्यालय बीडमध्ये किती मोठा घोळ आहे हे पहा व त्या ठिकाणी योग्य ती कारवाईसाठी शासनाकडे पाठपुरावा करावा अशी मागणी बीडच्या नागरिकांकडून होत आहे एमजेपी बीडचे उपकार्यकारी अभियंता गजाजन खराटे गुत्तेदार पोसण्यासाठी अतिरिक्त पदभार दिला?







## १.बागलाने सुपरवायजर :–

१) पांगरी रोड एकुण आठ लाईन व्हाल नाही आणि पाणी चालू केले नाही (टेस्टिंग)मेन लाईनला जोडणे बाकी.
२) भक्ती कॉन्स्ट्रक्शन येथील दहा लाईन टाकण्यात आल्या परंतू मेन लाईनला जोडणे बाकी व व्हाल बसविले नाही.
३) नगर रोड येथे पाच गल्ली जोडणे बाकी व व्हाल बसविणे बाकी टेस्टिंग घेणे बाकी.
४) अंबिका चौक येथे एकुण पंधरा गल्ली जोडण्यात आल्या परंतू मेन क्रॉसिंग बाकी आहे व व्हाल टाकले नाही आणि टेस्टिंग नाही.
५) गया नगर ते कॅनॉल रोड पर्यंत सहा लाईन टाकल्या व्हाल नाही टेस्टिंग नाही.
६) चक्रधर नगर येथे सहा गल्ली जोडले नाही व्हाल नाही टेस्टिंग नाही.
७) नळ कनेक्शन देणे बाकी.

**२) हादी सुपरवायजर :–**
१) दिलावर नगर येथे अकरा गल्ली जोडले नाही व टेस्टिंग नाही.
२) मिल्लत नगर येथे सहा गल्ली जोडले नाही व टेस्टिंग नाही.
३) हजरत बालेपीर स्कुल समोर सात गल्ली जोडले नाही व टेस्टिंग नाही.
४) मोहम्मदीया कॉलनी येथे पाच गल्ली जोडले नाही व टेस्टिंग नाही.
५) सय्यद आली नगर येथे आठ व्हाल नाही जोडले नाही व टेस्टिंग नाही.
६) नम्रता कॉलनी येथे आठ पाईप लाईन जोडले नाही व कनेक्टशन देणे बाकी आहे
७) नळ कनेक्शन देणे बाकी.

**३) हातागळे सुपरवायजर :–**
१) काझी नगर व इदगाह नगर जोडले नाही व क्रॉसिंग बाकी.
२) तेलगाव नका हुसैनिया कॉलनी येथे बारा गल्ली जोडले नाही.
३) शास्त्री नगर येथे पाईप लाईन जोडणी बाकी व व्हाल नाही.
४) नळ कनेक्शन देणे बाकी.

**४) शेरकर सुपवरवाजर :–**
१) संत नामदेव नगर एक गल्ली जोडणे बाकी.
२) अंकुश नगर टाकीचा मेन १ व्हाल व परिसरातील ३ व्हाल टाकणे बाकी तसेच बाकी टाकलेले व्हाल लिकेज आहेत.
३)कपीलमुनी व अंकुश नगर येथील पाईप लाईन लिकेज आहे.
४) अंकुश नगर भागातील एक क्रॉसिंग जोडणे बाकी.
५)नगर रोड ते सना फक्शन हाल पर्यंत मेन लाईन टाकणे बाकी आहे.
६)बालेपीरची एक गल्ली क्रॉसिंग बाकी आहे.
७) मुस्कान हाल जवळ तीन गल्लीत व्हाल टाकणे बाकी.
८) नगर रोड बीड हार्डवेअर तील गल्ली व्हाल टाकणे बाकी.
९) समर्थ लांन समोरील ३ गल्ली कनेक्शन दिलेले नाही.
१०)कालिका नगर येथील ५० ते ६० नळ कनेक्शन देणे बाकी.
११) एकता चाऊस गल्ली येथे पाणी जातो नाही.
१२) छेमिनार गल्ली क्रॉसिंग पाईप लाईन सह बाकी आहे.

**५) शब्बीर भाई सुपरवायजर :–**
१) इमामपूर रोड येथे सहा गल्लीमध्ये व्हाल नसल्यामुळे पाणी प्रेशरने मिळत नाही व तिथेच मेन लाईनला लिकेज आहे.
२) बार्शी नका जे. के. कॉलनी येथे सहा गल्ली कनेक्शन बाकी व मेन लाईन टाकणे बाकी.
३) बार्शी नाका ते मिल्लत स्कुल पर्यंत पाईप लाईन क्रॉसिंग बाकी.
४)मिल्लत नगर स्कुलच्या परिसरात अमृतची मेन लाईन १० इंच पाईप लाईन जुन्या ८ इंची मेन लाईनला जोडल्यामुळे त्या भागात पाणी पुरवठा होत नाही.
५) मोमीनपुरा येथे दोन गल्ली क्रॉसिंग बाकी व कनेक्शन देणे बाकी
६)मिल्लत नगर येथे ८ गल्ल्या पैकी ७ गल्ल्या कनेक्शन बाकी व क्रॉसिंग बाकी.
७)अमेर कॉलनी येथे ७ गल्ल्यापैकी ३ गल्ल्याचे कनेक्शन बाकी व पूर्ण पाईप लाईन लिकेज आहेत.
८) बुशटर पंपाजवळ ४ गल्ल्या कनेक्शन बाकी व क्रॉसिंग बाकी.

**६ ) वाडमारे सुपरवायजर :–**
१)दुबे कॉलनी येथे एका गल्लीमध्ये पाईप लाईन बाकी आहे.

**७) शेख अजहर सुपरवायजर :–**
१)माळीवेस चौक ते उन्हाळे हॉस्पिटल पर्यंत अपूर्ण क्रॉसिंग फक्त सावता माळी चौक ते फुलाई नगर टाकली पण ती लाईन चौकअप आहे.
२) डी.पी. रोड ५ गल्लीला व्हाल नाही.
३) शिवशारदा शोरूम जालना रोड ते स्मशानभूमी पर्यंत १० इंची पाईप लाईनला क्रॉसिंग केलेली नाही.
४) मसरत नगर, गोरे कॉलनी, सावता माळी कॉलनी इ. भागाची क्रॉसिंग केलेली नाही.
५) कागदी दरवाजा दलित वस्ती क्रॉसिंग ६ गल्लीमध्ये केलेली नाही.
६) खासबाग ४ ठिकाणी गल्ल्या जोडल्या नाहीत.

**८) हाडुळे सुपरवायजर :–**
१) हेडवर्क मेन लाईन टाकणे बाकी आहे ९०० ा
२) ईट फिल्टर येथे रिसायक्लीन सिस्टीम बाकी आहे.
३)इदगाह टाकीवर उंच टाकीला पाईप लाईन जोडणे बाकी आहे.
अमृतचं पेंडिंग कामे पूर्ण करणे करीता कोर्टात जनहित याचिका दाखल केल्याशिवाय पर्याय दिसून येत नाही असं सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ प्रतिनिधी सोबत नगर अभियंता सोबत ग्राउंड सर्वे करत करत चर्चा केली

# बीडच्या पाणीपुरवठ्याप्रश्नी आ.संदीप क्षीरसागरांकडून पुन्हा अजितदादांची भेट



## उन्हाळ्यापूर्वी सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी आ.क्षीरसागरांचा पाठपुरावा सुरू

बीड / प्रतिनिधी

बीड शहराच्या सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी आ.संदीप क्षीरसागर गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. आताही रविवारी (दि.१६) रोजी जुन्नर येथे आ.संदीप क्षीरसागर यांनी दुसर्यांदा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची याच संदर्भात भेट घेतली.

बीड शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी अमृत अटल योजना आणि बिंदुसरा धरण आणि माजलगाव बॅकवॉटरमध्ये पाण्याची पुरेशी उपलब्धता आहे. मात्र नगरपालिकेकडे महावितरण कंपनीचे ३६ कोटी रुपयांचे वीजबिल थकलेले आहे. त्यामुळे अमृत अटल पाणीपुरवठा योजनेसाठी आवश्यक असलेले नवीन वीज कनेक्शन देण्यात येत नसल्याने पाणी उपलब्ध असताना देखील बीड शहराला पाणी मिळत नाही. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी गेल्या अनेक दिवसांपासून विधीमंडळ अधिवेशनात, शासनाकडे, प्रशासकीय स्तरावर आणि न्यायालयात देखील हा बीडकरांचा मुलभूत प्रश्न मांडला आहे. सुयोगाने कर्तव्यदक्ष नेते ना.अजित दादा पवार यांच्याकडे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद आले असल्यामुळे आ.संदीप क्षीरसागर याविषयी ना.अजितदादांकडे या विषयात न्याय मागत आहेत. आ.क्षीरसागर यांनी याच विषयावर दोन आठवड्यांपूर्वी मुंबई येथे ना.अजितदादांची भेट घेतली होती. आता पुन्हा याच विषयावर आ.क्षीरसागरांनी ना.अजितदादांची रविवारी (दि.१६) रोजी जुन्नर येथे भेट घेतली. यावेळी ना.अजित दादा पवार यांनी विद्युत विभागाचे व्यवस्थापकीय संचालक यांना याविषयी तातडीने मार्ग काढण्यासाठी आदेश दिले आहेत. उन्हाळ्याच्या पूर्वी बीड शहराचा पाणीपुरवठा ना.अजितदादांच्या माध्यमातून सुरळीत होईल आणि गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या बीडकरांच्या मुलभूत सोयीसाठी सुरू असलेल्या पाठपुराव्याला यश येईल असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

## गजानन खराटे बीडच्या एमजेपी कार्यालयातील एकूण पाचशे कोटीच्या पाणी पुरवठा योजना गुत्तेदारांना अकाउंटंट ठाकूरच्या माध्यमातून टक्केवारी पंचवीस योजनांमध्ये ३६६ कोटीच्या योजना फसण्याच्या तयारी खराटे, ठाकूर?

एमजीपीचे अधिकारी लोलापोड,वाघ, पठाण, ठाकूर, अर्षद, बीड शहर अटल अमृत पाणी पुरवठा एमजेपी कार्यालयातील अभियंते श्री. लोलापोड, श्री. कोळी, पाटील, श्री.जोगदंड, श्री.पाटील, श्री.पठाण, श्री सानप, श्री. वाघ, श्री.राख,श्री.धाये, श्री.अर्शद, अकाउंट श्री ठाकूर, यांची चौकशी लावा शहरातील अनेक ठिकाणी अमृत योजनेला सलग्न पाईपलाईन जोडलेले नाही पाणी कसं येईल नगर अभियंता, मुख्याधिकारी, यांनी सांगितले नगर परिषद प्रशासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला अनेकदा पेंडिंग कामाची यादी दिली, बऱ्याचदा मिटिंग झाल्यात तोडगा निघत नाही, १२७ कोटीची योजना सात वर्षात १०२.५६ खर्च झालं तरी योजना पूर्ण झाली असं म्हणता येणार नाही हे पण तितकेच खरं, आजही बीड शहर तहानलेलं आहे सध्या नळाला पाणी २० दिवसाला येतो अटल अमृत बीड शहर पाणी पुरवठा योजना – बीड शहरातील अपुर्ण कामाची यादी हे काम कोणीच करायला तयार नाही

# प्रितमताई मुंडे : स्वाभिमानी, सुसंस्कृत व दूरदृष्टी असलेले संयमी नेतृत्व

प्रितमताई मुंडे..... महाराष्ट्राचा राजकीय इतिहास हा स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे नाव घेतल्याशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचा वसा आणि वारसा महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री नामदार पंकजाताई मुंडे यांच्या बरोबरच डॉ. प्रीतमताई ही अगदी समर्थपणे पुढे चालवत आहेत बीड जिल्ह्याच्या मा. खासदार महाराष्ट्राच्या राजकारणातला एक स्वाभिमानी, सुसंस्कृत व दूरदृष्टी असलेले संयमी नेतृत्व म्हणून डॉ. प्रितमताई मुंडे यांच्याकडे पाहिले जाते. राजकारणा सोबतच समाजकारणातही कायम आघाडीवर असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ. प्रितमताई यांच्या नेतृत्वाकडे पाहिले जात आहे. समाजातील वंचित, पीडित घटकांच्या सेवेसाठी आपले आयुष्य अर्पण करणाऱ्या लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे अधुरे स्वप्न पूर्ण करण्याचा ध्यास घेत, उद्यमशील वृत्तीने प्रत्येक संकटावर मात करत अविरतपणे वाटचाल करणारे हे स्वाभिमानी, सुसंस्कृत व दूरदृष्टी असलेले संयमी, धुरंदर नेतृत्व आज सर्वसामान्य कार्यकर्त्याचं प्रेरणास्थान बनलं आहे.



असे म्हणतात की, जे वसे मनी, ते दिसे स्वप्नी पण प्रितमताईंच्या बाबतीत जे मनातही नव्हते आणि स्वप्नातही नव्हते ते त्यांच्या जीवनात प्रत्यक्ष घडले. वडील लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे अकाली निधन झाल्यामुळे त्या अपघाताने राजकारणात आल्या. २०१४ मध्ये वडिलांच्या आकस्मिक निधनानंतर बीड लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक झाली. या निवडणुकीत डॉ. प्रितमताई मुंडे या विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्या. त्या ६,९६,३२१ मतांनी जिंकल्या, जो एक राष्ट्रीय विक्रम ठरला. त्यानंतर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ही त्या पुन्हा कर्तुत्व आणि जनतेशी जनसंपर्क आणि जनसेवेच्या भूमिकेमुळे पुन्हा विक्रमी मतांनी खासदार झाल्या. सलग दोन वेळा विक्रमी मताने त्या खासदार होण्याचा मान त्यांनी मिळवला. खासदार झाल्यानंतर त्यांनी वडिलांचे अधुरे आणि जिल्ह्यातील जनतेचे गेल्या पाच दशकांचे स्वप्न पूर्ण करण्याचा निर्धार केला. बीड जिल्ह्याच्या जिव्हाळ्याचा असलेला अहमदनगर - बीड - परळी रेल्वेचा प्रश्न संसदेत अगदी प्रभावीपणे मांडल्यामुळे आणि त्याचा कायम पाठपुरावा केल्याने आज रेल्वे मार्ग पूर्णत्वास जात आहे. त्यामुळे त्यांची बीड जिल्ह्यात 'रेल्वेताई' या नावाने ओळख निर्माण झाली आहे.

सध्या महाराष्ट्राचं राजकारण ज्या दिशेने जात आहे, ते सर्वसामान्य माणसाला खटकणार आहे. अशा स्थितीतही कायम जनतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होता कामा नये ही त्यांनी केलेली अपेक्षा त्यांच्यात सामान्य माणसाविषयी असलेली तळमळ दाखवून देते. डॉ. प्रितमताई मुंडे यांनी लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या संघर्ष, सेवा आणि नेतृत्वाचा वारसा घेऊन बीड जिल्हा आणि महाराष्ट्राच्या राजकारणात आपल्या कर्तुत्वाने एक वेगळी ओळख त्यांनी निर्माण केली आहे.

डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यकर्ते आणि समर्थक विविध सामाजिक उपक्रम राबवतात. रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, गरीबांना मदत आणि सामाजिक उपक्रम हे त्यांच्या वाढदिवसाचे वैशिष्ट्य आहे. त्या केवळ राजकारणात नव्हे, तर सामाजिक कार्यातही कायम अग्रस्थानी असतात. त्यांनी आपल्या कार्यकुशल नेतृत्वामुळे लोकांच्या मनात स्थान मिळवले आहे. त्यांचा वाढदिवस म्हणजे महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी दिवस असतो. त्या पुढील काळातही समाजहिताचे कार्य अविरत करत राहोत, हीच शुभेच्छा!

डॉ. प्रितमताई मुंडे यांचे स्वाभिमानी, सुसंस्कृत व दूरदृष्टी असलेले संयमी नेतृत्व आज सर्वसामान्य कार्यकर्त्यांचं प्रेरणास्थान बनलं आहे. आमच्या लाडक्या ताईला वाढदिवसाच्या मनपूर्वक लक्ष - लक्ष शुभेच्छा!!!

आपलाच: अमोल तांदळे, ९४२००३२४३३

# निराधारांच्या बंद पडलेल्या पगारी सुरु करण्यात याव्यात




## त्यांना ३ हजार रुपये मानधन देण्यात यावे. डीडीसी अट रद्द करण्यात यावी

## सय्यद सलीमबापू यांच्या नेतृत्वाखाली आंबेडकरी विचार मोर्चाचा तहसीलसमोर रास्ता रोको

**माजलगाव ।प्रतिनिधी**

**निराधारांच्या बंद पडलेल्या पगारी तात्काळ सुरू करण्यात याव्या त्यांना तीन हजार रुपये मान देण्यात यावे व डीडीसीची जाचक अट तात्काळ रद्द करण्यात यावी यासह विविध मागन्यासाठी सय्यद सलीमबापू(मराठवाडा अध्यक्ष) यांनी आंबेडकरी विचार मोर्चा व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा संघटनेमार्फत माजलगाव तहसील कार्यालया समोर सोमवार दि.१७ रोजी रास्ता रोको आंदोलन सुरू केले.**

यावेळी आंदोलनकर्त्यांनी तहसिल कार्यालय माजलगाव येथील कर्मचारी हे जाणीवपुर्वक संजय गांधी,इंदीरा गांधी,श्रावणबाळ, अर्थसहाय्यता या निराधार लोकांची अडवणुक करीत असल्याचा आरोप केला.निराधारांच्या पगारी वेळेवर वाटप करीत नाहीत.तसेच त्यांना सांगण्यात येते की,तुम्ही आधार लिंक करा,परंतु काही लोकांचे अंगठे येत नाहीत त्याचे काय?असा प्रश्न आंदोलनकर्त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांना केला. निराधारमध्ये अनेक अंधळे, लंगडे, बहिरे,मुके,कुष्ट रोगी,कॅन्सर पेशन्ट, वयस्कर,विधवा इत्यादी लोकांची आपल्या कार्यालयामार्फत वेठीस धरल्या जात आहे.त्यामुळे निराधारांची हेळसांड होत आहे. कर्मचारी त्यांना अपमानास्पद वागणुक देत आहेत.तसेच त्यांची हयातनाम्याच्या नावाखाली अनेक पगारी बंद करण्यात आलेल्या आहेत.पगारी अडवुन ठेवण्यात आलेल्या आहेत.त्यामुळे वरील लोकांना आर्थिक त्रास होत आहे. तसेच दवाखान्याचा इलाज होत नाही.त्यांना खाण्या-पिण्यासाठी अन्न भेटत नाही.त्यामुळे त्यांना जिवन नकोसे झालेले आहे.तसेच आपल्याकडे निराधाराला मंजुर झालेल्या पगारीबाबत मुळ संचिका आहे का?तसेच निराधारांच्या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये किती

बैठका झाल्या?व किती पगारी मंजुर करण्यात आल्या?याची माहिती देणे,तसेच किती निराधार मयत झाले याची नोंद आपल्या 'कार्यालयाकडे आहे का?इत्यादी निराधारांच्या अनुषंगाने आवश्यक अशा प्रश्नांना वाचा फोडत सय्यद सलीमबापू यांनी आपल्या कार्यकर्त्यांमार्फत वरील सर्व मागण्या पूर्ण करण्यात याव्यात अशी मागणी लावून धरली. ॲड. सय्यद अल्ताफ, , शेख इलियास,मिर्झा महमूद, बाबासाहेब साळवे. समीर सिद्दिकी, शेख महमूद, शेख अंजरभाई, व असंख्य निराधार महिला व पुरुष उपस्थित होते

# पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे बिंदुसरा नदीचे पुनरज्ञीवन करावे ; बिंदुसरा नदी प्रदुषण

बीड : बीड शहरातील बिंदुसरा नदीचे पुनर्जीवन करावे . बिंदुसरा नदीपात्रातील अतिक्रमित बांधकाम तसेच नगरपरिषद कर्मचाऱ्यांमार्फत कचरा टाकणे तसेच जैविक कचरा यामुळे नदीचे प्रदुषण होत असुन बीडकरांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. बिंदुसरा नदीच्या प्रदूषणास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी आणि बिंदुसरा नदीचे पुनर्जीवन करावे या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१७ सोमवार रोजी सकाळी बिंदुसरा नदीवरील दगडी पुल नदीपात्रात लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड, मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांच्या मार्फत पर्यावरण मंत्री, वातावरणीय बदल मंत्री पंकजाताई मुंडे, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितजी पवार, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी आंदोलनात रामनाथ खोड, शेख युनुस, बीड जिल्हाध्यक्ष आप अशोक येडे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, सुदाम तांदळे, पांडुरंग हराळे,शेख मुबीन आदी सहभागी होते.




अतिक्रमण मुक्त करा मागणीसाठी बिंदुसरा नदीपात्रात लक्ष्यवेधी आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीड शहरातील बिंदुसरा नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर सांडपाणी कचरा व जैविक कचरा टाकण्यात आला आहे त्यामुळे मोठ्या प्रमाणावर नदीचे प्रदुषण झाले आहे.त्यामुळे बीड शहरातील बिंदुसरा नदी प्रकल्पाचा आढावा घेऊन बिंदुसरा नदीपात्रातील भुमाफियांकडुन होणारे अतिक्रमित बांधकाम, बिंदुसरा नदीपात्रात मनपा कर्मचाऱ्यांमार्फत टाकला जाणारा कचरा तसेच जैविक कचरा यामुळे बीडकरांचे आरोग्य धोक्यात असुन भविष्यात १९८९ सारखी पुरस्थिती निर्माण झाल्यास मोठ्या प्रमाणावर वित्तहानी आणि जिवितहानी होऊ शकते यासाठी नगरपरिषदेने सीमारेषा आखुन फ्लड झोन,ग्रीन झोन,रेड झोन, यल्लो झोन आदी बाबत उपाययोजना करण्यात यावी. पूररेषेच्या आत असणारी अतिक्रमित बांधकाम प्रकरणी हलगर्जीपणा करणाऱ्या नगरपरिषद प्रशासनातील अधिकाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

# खरिप हं.२०२४ चा पीकविमा कधी मिळणार ? - शिवराम राऊत

## शिवश्री कृषि मंडळ ची कृषि आयुक्त पुणे यांना लेखी तक्रार

शिरूर / प्रतिनिधी

खरिप हंगामी पीक लागवडी नंतर बीड जिल्ह्यातील शेतक-यांनी एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी कडे पीक विमा भरलेला असतांना, खरिप हंगामातील सततच्या पावसाने सोयाबिन,कपाशी,बाजरी,अशा अनेक पिकांचे नुकसान होऊन विशेषतः सप्टेबंर महिन्यातील अतिवृष्टीने कपाशी,तुर, व इतर पिकांचे २५% पेक्षा अधिक नुकसान झाल्याने, शासनाने नमुना सर्वे पंचनामा करून या संबंधातील मदती अनेक महिन्यांच्या प्रतिक्षा नंतर प्राप्त होत आहेत.त्याच वेळी एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीच्या नियमा प्रमाणे बहुतांश शेतक-यांनी वैयक्तिक तक्रारी करून कंपनीच्या प्रतिनिधींनी प्रत्यक्ष पाहणी करून कंपनी कडे अहवाल देऊन सह महिने होऊन गेलेले आहेत तरी अद्याप शेतक-यांना पीक विमा रक्कम मिळाली नाही.

यासाठी शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा च्या वतीने अनेकवेळा जिल्हाधिकारी बीड,कृषि अधिक्षक यांना तक्रारी केल्या आहेत तरी देखील एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीकडुन पीडित शेतक-यांची कोणतीच दखल घेतली नसल्याने नेतक-यांथ असंतोष वाढत आहे.या विषयी जनप्रतिनिधी कोणतीच भूमिका घेत नसल्याने पीक विमा कंपनीवर वचक नसल्यानेच शेतक-



यांवर अन्याय होत असल्याची भावना शेतकरी समाजात आहे.शासनाच्या वतीने १ रू पीकविमा या योजनेत शासन विमा कंपनीला शासनाचा व शेतक-यांचा हिस्सा कोट्यावधी रूपये देत आहे.मग पिकांचे नुकसान होऊन देखील विम्याचे पैसे शेतक-यांना देण्यात एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी एवढा विलंब का करत आहे ? असा प्रश्न शेतक-यांना आहे.तरी या संबंधातील ठोस भूमिका जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी,आमदार-खासदार व यांनी घेणे आवश्यक आहे.तरी शिवश्री कृषि मंडळ हिवरसिंगा यांच्या वतीने कृषिआयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे यांना लेखी तक्रार करून २०२४ च्या खरिप हंगामी झालेल्या नुकसानीचा विमा मिळवून देण्यासाठी सर्व प्रयत्न करण्याचे शिवराम राऊत यांनी कळवले आहे.

# पेठ विभाग शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात होणार साजरा - रोहित फावडे

धारूर / प्रतिनिधि

किल्ले धारूर पेठ विभागातील शिवजन्मोत्सव दि.१९ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणार असल्याने धारूर शहरात ठिकठिकाणी संपूर्ण भगवे झेंडे लावून परिसर भगवामय करण्यात आलेले आहे व शिवजन्मोत्सव निमित्त हर घर भगवा ध्वज चा उपक्रम आयोजित शिवजन्मोत्सव पेठ विभागाने राबवलेला आहे मागच्या काही दिवसापूर्वी शिवजन्मोत्सव पूर्व तयारीसाठी शिवभक्तांनी बैठकीचे आयोजन केले होते आयोजित बैठकीत विविध सामाजिक उपक्रमांनी शिवजन्मोत्सव साजरा करण्याचे एकमताने ठरवले यावेळी ज्येष्ठ मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली पदांच्या नियुक्ती करण्यात आल्या होत्या पेठ विभाग शिवजन्मोत्सव अध्यक्षपदी गुलाब गायकवाड तर उपाध्यक्ष वैभव चव्हाण, तर कोषाध्यक्ष माऊली औताडे, सचिव रोहित फावडे या सर्वांची सर्वनुमते निवड झाली होती या पदाधिकाऱ्यांसह शिवभक्तांनी शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी जीवाची बाजी लावत जयत्त तयारी केली आहे.



ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौकात विविध उपक्रम साजरा होणार आहेत लातूर येथील उत्कृष्ट ढोल ताशा पथक ऐतिहासिक किल्ले धारूर शहरात येणार आहे तर संबळ पथक, महिला झांज पथक, साऊंड लाईट शो अशे अनेक उपक्रम छत्रपती शिवाजी महाराज चौकात साजरा होणार आहेत.उत्साहात होणाऱ्या शिवजन्मोत्सव सोहळासाठी आपण सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे शिवजन्मोत्सव पेठ विभाग वतीनी सांगण्यात आले आहे.

# उत्तरेश्वर वाघमारे यांचे लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन

माजलगांव ।सुनिल थोरात

माजलगाव तालुक्यातील देवखेडा येथील रहिवासी असलेले उत्तरेश्वर विठ्ठल राव वाघमारे यांचे एमपीएससी परीक्षेत घवघवीस यश त्यांनी संपादित केले आहे त्यांनी महसूल सहाय्यक पदी त्यांची नियुक्ती झाली आहे या प्रवासात त्यांना या तीन ते चार वर्षांमध्ये खरतड प्रवास करून अखेर त्यांनी या पदाला गवसणी घातली आहे २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या एमपीएससी परीक्षेचा नुकताच निकाल लागलेला आहे मूळचे देवखेडा येथील रहिवासी असलेले व हल्ली पुणे येथे वास्तव्यात असलेले उत्तरेश्वर विठ्ठलराव वाघमारे हे अल्पभूधारक परिस्थितीवर बिकट असल्याने त्यांनी गाव सोडून खाजगी मध्ये नोकरी करत आपला अभ्यास पूर्ण केला आहे आणि आपल्या जिद्दीच्या जोरावर त्यांनी हे संपादन केले आहे यामुळे त्यांनी आपल्या मूळ गावी देवखेडा येथे जाऊन नागरी सत्कार त्यांनी आज स्वीकारला आहे या सत्कार सोहळ्यासाठी गावातील सरपंच तसेच प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून अनेक व्यक्ती महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या




यावेळी सरपंच म्हणून शशिकांत मस्के भगवानराव कदम किशोर जोगडे. सुंदर वाघमारे. सूर्यकांत कदम .शेषनारायण जोगडे . रणजीत वाघमारे .भागवत शेरकर .संजय वाघमारे .अभिमान वाघमारे .शेषेराव मसके.महादेव आडागळे .मनोज कांबळे सर . मोहनराव वाघमारे शिवाजी लोखंडे तसेच यावेळी बालू राऊत माजी सरपंच तसेच अनेक गावातील प्रतिष्ठित व्यक्ती महिला यावेळी सत्कार समारंभासाठी उपस्थित होते.

# गेवराईत शेतीच्या वादातून शेतकऱ्याने विष घेऊन संपवले जीवन

## संतप्त कुटुंबीय आक्रमक; गुन्हा दाखल करण्याची मागणी

प्रतिनिधी । गेवराई

गेवराई, दि.१७ : शेतीच्या वादातून शेतकऱ्याने वीष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना गेवराईत घडली. उध्दव अर्जुन लाड(वय ४५)रा. गेवराई जि.बीड असे मृत शेतक-याचे नाव आहे. दरम्यान, संतप्त नातेवाईकांनी मानसिक त्रास देणाऱ्या संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल करावा अशी मागणी करत जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही. तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भुमिका घेतली होती. शेवटी आज काल रविवारी सकाळी नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेतला.

शेतकरी उध्दव लाड (वय ४५) यांनी शनिवार (दि १५)दुपारी तीन वाजेच्या सुमारास विष घेतले. याची कुटुंबीयांना माहीती मिळताच त्यांना तात्काळ गेवराईच्या उपजिल्हा रुग्णालयात उपचारास दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने उध्दव लाड यांना बीडच्या जिल्हा रुग्णालयातील येथील जिल्हा रूग्णालयात हलविण्यात आले.उपचार सुरु असताना सदरील शेतक-याचा रविवारी(दि १६) सकाळी ९ वाजेच्या दरम्यान मृत्यू झाला.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, आई असा परिवार आहे.



दरम्यान,मृत उध्दव लाड आणि त्यांचे भाऊ बाळासाहेब लाड यांनी राहेरी येथील गट क्र. १४० मधील खरेदी खत क्रमांक ४८५२/२०२४ दि.५/९/२०२४ च्या खरेदीखताची चौकशी करून न्याय द्यावा अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे दि २५ जानेवारी २०२५ रोजी निवेदनाद्वारे केली होती. शेतीच्या प्रकरणात फेर ओढू नका म्हणून उपविभागीय अधिकाऱ्यांनी दि. १२ फेब्रुवारीपर्यंत स्टे दिला होता. मात्र तो स्टे त्यांनी (दि १४) या लाड बंधूना माहीती परस्पर होता परस्पर उठविला. त्यानंतर तलाठ्यांनी फेर ओढला. तेंव्हापासून मृत उध्दव लाड हे चिंतेत होते. मनस्ताप त्यातूनच त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे मृत शेतक-याचे भाऊ बाळासाहेब लाड यांनी सांगितले.

# १८ फेब्रुवारी रोजी जवळा फकीर येथे पहिली बौद्ध धम्म परिषद - डॉ संजय नाकलगावकर

माजलगाव / प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जवळा फकीर येथे १८ फेब्रुवारी २०२५ रोजी पहिली अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली असून या धम्म परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ संजय नाकलगावकर यांनी केले आहे या धम्म परिषदेचे उद्घाटन १८ फेब्रुवारी रोजी मृगदायवन महाविहार, जवळा फकीर येथे डॉ. भदंत प्राचार्य खेमधम्मो महाथेरो, मुळावा यांच्या हस्ते होणार आहे. तर धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय भिक्खू संघाचे कार्याध्यक्ष डॉ. भदंत उपगुप्त महाथेरो, पूर्णा हे असणार आहेत. सकाळी १० वाजता धम्म ध्वजारोहण होणार आहे. त्यानंतर महाबोधी वंदना होईल. तर सकाळी ११ ते १२:३० यादरम्यान भिक्खू संघास भोजनदान आणि त्यानंतर दुपारी १ वाजता धम्मदेसनेस सुरुवात होणार आहे. धम्म परिषदेस डॉ. प्रा. सत्यपाल महाथेरो, डॉ. भदंत इंदवंस महाथेरो, विपस्सनाचार्य भदन्त पय्यारत्न थेरो, भदन्त पय्याबोधी थेरो, भदन्त मुदितानंद थेरो, भदन्त ज्ञानरक्षित थेरो, भदन्त महाविरो थेरो, भदन्त पय्यानंद थेरो,



भदन्त पय्याशील थेरो, भिक्खू धम्माल थेरो, भिक्खू रेवतबोधी, भिक्खू पय्यावर्धन, भिक्खू संघरत्न, भदन्त धम्मघोष यांची धम्मदेसना होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून आ. प्रकाश दादा सोळंके, बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, डॉ. सिद्धार्थ हत्तीअंबीरे, प्रा. प्रदीप रोडे, राजेंद्र कांबळे, प्रकाशजी कोकाटे, भाई कीर्तीकुमार बुरांडे, जवळा फकीरचे सरपंच त्र्यंबक साबळे, माजी सरपंच सुनीता मिसाळ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या धम्म परिषदेस धम्म बांधवांनी व उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन धम्म उपासक डॉ संजय नाकलगावकर यांनी केले आहे.

# प्राजक्ता तांगडे चा सत्कार महसूल सहाय्यक पदी निवड

पिंपळनेर / प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळनेर परिसरात असलेल्या बोरदेवी येथील शेतकरी कुटुंबातील प्राजक्ता रामेश्वर तांगडे हिची नुकतीच महसूल सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला व तीच्या वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने महसूल सहाय्यक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत शेतकरी कुटुंबातील प्राजक्ता रामेश्वर तांगडे या मुलीने घवघवीत यश संपादन केले असून या यशाने बोरदेवी ग्रामस्थ व कुटुंबातील नातेवाईकांनी आनंद उत्सव साजरा केला. यावेळी प्राजक्ता तांगडे हिचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा



दिल्या. यावेळी भानुदास तांगडे, सुधाकर तांगडे, परमेश्वर तांगडे, रामेश्वर तांगडे, सिद्धार्थ कांबळे, राहुल कांबळे, सचिन कांबळे, दिलीप आर्सुळ, बारीक आर्सुळ, अशोक घुगे,आर.पी.आय तालुका अध्यक्ष किशन तांगडे, सिद्धार्थ वाघमारे, आनंद मोरे, शिवसेना ठाकरे गटाचे नेते परमेश्वर सातपुते ,ऋषिकेश गिरी, पासायदा सेवा प्रकल्पाचे संचालक गोवर्धन दराडे आणि रंजना दराडे, सुभाष तांगडे, भाऊसाहेब कांबळे, अशोक भांगे सह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शंभर कुटूंबांना जीवनावश्यक वस्तुंचे वितरण

मानवलोकचा पुढाकार

अंबाजोगाई -जनसहयोगच्या वतीने लोकसहभागातून शंभर वयोवृद्ध कुटुंबांना जीवनावश्यक वस्तुचे शनिवारी १५ फेब्रुवारी रोजी दुपारी वितरण करण्यात आले. यावेळी डॉ.सिध्देश्वर बिराजदार,डॉ.सुनिता बिराजदार,कल्पना लोहिया,भागवत कांबळे, अरुण आसरडोहकर आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना डॉ.बिराजदार म्हणाले की,डॉ. व्दारकादासजी लोहिया असताना धान्य वितरणावेळी होतो तेव्हा त्यांनी म्हटले होते की, तीस,पस्तीस जणांना किराणा वितरण होत आहे, परंतु पुढील काळात मी असेन नसेन शंभर



पर्यंत लोकांना धान्य किराणा वितरण होईल त्यावेळी बाबुजी बोलले ते आज सत्य रुपात आले त्यामुळे मी समाधानी आहे. माझ्या कडून या उपक्रमासाठी अर्थसहाय्य राहील असे सांगितले.

कल्पना लोहिया म्हणाल्या की, ज्यांना आधार नाही त्यांचा उदरनिर्वाह भागविण्या साठी मानवलोकने पुढाकार घेऊन लोकसहभागातून दर महिन्याला जीवनावश्यक वस्तुंचे वितरण केले जाते.जे भरघोस मदत करतात त्यांच्यामुळे हा उपक्रम सुरू आहे असे त्या म्हणाल्या. शाम सरवदे यांनी प्रास्तविक केले यावेळी संजना आपेट, सावित्री सगरे यांच्यासह इतर उपस्थित होते.

# धारूर शिक्षण विभागाचे डोके ठिकाणावर आहे का ? एक वर्षापूर्वी सेवानिवृत्त शिक्षकास क्षमता वृद्धी प्रशिक्षनास बोलावले

धारूर / रोहित फावडे

धारूर शिक्षण विभागाचा पुन्हा एकदा बोगस कारभार चव्हाट्यावर आल्याचे दिसून येत आहे. एक वर्षापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकास चक्क क्षमता वृद्धी प्रशिक्षणास बोलवण्यात आले आहे. यामुळे धारूरचा शिक्षण विभाग कसा चालत असेल याची कल्पना येते. तर एका विद्यालयात कराड नावाचे शिक्षकच नाहीत आणि त्यांच्या नावाची प्रशिक्षणासाठी ऑर्डर काढण्यात आली आहे. यातून शिक्षण विभाग किती काळजीपूर्वक काम करतोय हे दिसून येत आहे. याविषयी अधिक माहिती अशी की शिक्षक सक्षमीकरण प्रशिक्षण क्षमता वृद्धी




## सर्व बोगस भरती ,नावातही चुका

प्रशिक्षण सध्या संपूर्ण महाराष्ट्रात सुरू आहेत. धारूर तालुक्यातही कारी येथे प्रशिक्षण सुरू आहे परंतु शिक्षण विभाग या प्रशिक्षणाला गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून येत आहे धारूर येथील सरस्वती माध्यमिक विद्यालयातील आपेट डी पी हे शिक्षक गेल्या वर्षीच सेवानिवृत्त झाले आहेत परंतु तरी देखील धारूरच्या शिक्षण विभागाने अकलेची तारे तोडत त्यांना प्रशिक्षणास बोलावले आहे.

तर तालुक्यातील धारूर केंद्रांतर्गत येणारे एका शाळेमध्ये कराड नावाचे शिक्षकच नाही आणि त्यांच्या नावाची त्या शाळेतून ऑर्डर काढण्यात आली आहे मुख्याध्यापकांना हे पाहून आश्चर्याचा धक्काच बसला हे शिक्षकच आमच्या इथे नाही तर त्यांचे ऑर्डर कशी यातून धारूरचा शिक्षण विभाग किती ढिसाळ कारभार करतोय हे दिसून येत आहे. अशा ढिसाळ कारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांची कर्मचाऱ्यांची शिक्षण विभागाने चौकशी करावी अशी मागणी शिक्षण प्रेमी नागरिकांतून होऊ लागली आहे.

# वारकरी संप्रदायातील मधुकर खाडे हे निष्काम कर्मयोगी होते -ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे

## होळ येथे वै.पै.मधुकर महाराज खाडे यांच्या स्मरणार्थ किर्तन

प्रतिनिधी । केज

जो कोणत्याही फळाची किंवा परिणामांची अपेक्षा न करता, निःस्वार्थ, इच्छाशून्यपणे कर्तव्य करतो, त्याला निष्काम कर्मयोगी म्हणतात. वारकरी संप्रदायातील मधुकर महाराज खाडे हे निष्काम कर्मयोगीच होते, असे प्रतिपादन होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सहसचिव ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे कोद्रीकर यांनी व्यक्त केले.

वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. गंगापुजनानिमित्त केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह होत आहे. भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे सहसचिव असलेले ह.भ.प.अर्जुन महाराज लटपटे हे रविवारी (दि.१६) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. अर्जुन महाराज लटपटे यांनी संत तुकाराम महाराज यांचा 'इहलोकींचा हा देह । देव इच्छिताती पाहे ।।१।। धन्य आम्ही जन्मा आलो । दास विठोबाचे झालो ।।ध्रु. आयुष्याच्या या साधने। सच्चिदानंद पदवी घेणे



।।२।। तुका म्हणे पावठणे । करू स्वर्गाची निशाणी ।।३।।' हा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता. महाराज म्हणाले, होळ पंचक्रोशीतील दिवंगत व्यक्तींमध्ये आवर्जून नाव घ्यावे, अशा मंडळींमध्ये मधुकर महाराज खाडे यांचा नामोल्लेख होईल. त्यांनी कुस्ती, वारकरी संप्रदाय, राजकारण या क्षेत्रात पूर्ण ताकदीने झोकून दिले. जन्माला आलेला देह आपल्यातून निघून जातो. चांगुलपणाचे मूर्तिमंत व्यक्तीमत्व असलेले मधुकर महाराज खाडे यांचे निधन झाले. ते निष्काम सेवा करणारे होते. भगवंताचे चिंतन करणारे मानवी शरीर स्वर्गात स्थान प्राप्त करते. त्यासाठी जात, कुळ, धर्म याची अट ईश्वराने घातलेली नाही. मधुकर महाराज खाडे हे सेवा करून मोकळे होत असायचे, त्यांनी कधीही मालक होण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांच्या निष्काम सेवेचे स्मरण रहावे, यासाठी भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेत समाधी व्हावी अशी अपेक्षा अर्जुन महाराज लटपटे यांनी व्यक्त केली. अलीकडे प्रत्येकाच्या मनात मालक होण्याची भावना असते. सेवा करण्याची वृत्ती लोप पावत चालली आहे. दास्यभक्ती ही सर्वश्रेष्ठ सेवा आहे. सेवेतून मानवी शरीर देखील देवरूप होऊ शकते, त्यासाठी तितका भक्तिभाव गरजेचा आहे, तो मधुकर महाराज खाडे यांच्या अंगी होता, असेही अर्जुन महाराज लटपटे म्हणाले. यावेळी होळचे ग्रामस्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री यांचे किर्तन होणार

होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. डॉ.प्रल्हाद महाराज शास्त्री यांचे मंगळवारी (दि.१८) किर्तन होणार आहे. या किर्तनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते तथा कन्हेरवाडी गावचे सरपंच मा. राजेभाऊ फड यांच्या वतीने कन्हेरवाडी येथिल अनंत वैजनाथ मुंडे यांच्या मूलीच्या विवाहासाठी १०००० रू मदत मुलीचे मामा जयराम वाल्मीक फड यांच्याकडे सुपुर्द करण्यात आली, यावेळी ग्रा.प. सदस्य प्रल्हाद गित्ते, मधुकर मुंडे टेलर, लक्ष्मण खांडे,अन्नासाहेब बहिरे, महादेव मामा मुंडे, अरुण मुंडे, राजु भरत फड, समाधान मुंडे आदि ग्रामस्थ उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांसह तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील - आ.विजयसिंह पंडित

## वडगाव (चिखली) येथे १ कोटी २५ लक्ष रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ संपन्न

गेवराई / प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघातील विविध विकास कामांचा बॅकलॉग भरुन काढण्यासाठी प्रामाणिक काम करत भैय्यासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण भागातील शेती आणि शेतीशी संबंधित असणाऱ्या शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांसह तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कायम प्रयत्नशील राहणार असल्याचा विश्वास गेवराई मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी येथे बोलताना व्यक्त केला.

गेवराई तालुक्यातील वडगांव (चिखली) येथे गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्या शुभहस्ते १ कोटी २५ लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचा शुक्रवार दि.१४ फेब्रुवारी रोजी भव्य शुभारंभ पार पडला यावेळी ते बोलत होते. यावेळी स्व.माणिकराव काळे पाटील प्रतिष्ठान व ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर रा.कॉं.पार्टीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, जेष्ठ कार्यकर्ते भागवतराव काळे, पं.स.सदस्य परमेश्वर खरात, जयसिंग जाधव, प्रा.मुकुंद काळे, ड.सोमेश्वर काळे, राजेंद्र वारंगे , कृ.उ.बा.स संचालक अशोक खरात , सरपंच मच्छिंद्र ढेरे , संपादक अमोल वैद्य, पत्रकार विनोद पौळ, बाळू वारे, तीर्थराज गवारे, ग्रामसेवक राजेंद्र बन, प्रल्हाद यादव, बापूसाहेब हुंबरे, ग्रा.पं. सदस्य अशोक जाधव सह गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ उपस्थित होते.

पुढे बोलताना आ.पंडित म्हणाले की, मतदारसंघातील अनेक गावांत विविध कामे प्रलंबित आहेत. ती विकास कामे आपल्याला मार्गी लावायची आहेत. राज्यात आपलं सरकार आहे. पाच वर्ष हे सरकार आपलं सरकार आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते अजितदादा पवार हे आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत. त्यामुळे पाच वर्षात जास्तीत जास्त निधी तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणून भैय्यासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली आपल्याला विविध कामे करायची आहेत. शिवछत्र परिवाराबरोबर मायबाप मतदार आणि तरुण कार्यकर्त्यांनी माझ्यावर विश्वास दाखवला मला साथ दिली. मतदारांच्या खूप अपेक्षा आहेत. सर्वांच्या अपेक्षा नक्कीच पुर्ण करण्यासाठी आपण प्रयत्नशील असणार आहेत. आपण



दिलेले प्रेम हे विसरुन चालणार नाही. हे जे काही ऋण आहे याच्यातनं कधीच उतराई होणार नाही. कारण दहा वर्षापासून शिवछत्र परिवार संघर्ष करतोय आपण ते उद्दिष्ट साध्य केलं ते तुम्ही करुन दाखवलं त्याच्यामुळे याची जाणीव निश्चितपणाने संपूर्ण परिवाराला आहे. तसेच आता जिल्हा परिषद, पंचायत समिती, आणि नगरपालिकेच्या निवडणूका होतील यातही शिवछत्र परिवार आपल्या सर्वांच्या सहकार्याने वर्चस्व प्रस्थापित करेल असा विश्वास व्यक्त करुन कार्यकर्त्यांनी यासाठी कामाला लागावे असे आवाहनही शेवटी बोलताना व्यक्त केले. यावेळी परमेश्वर खरात, भाऊसाहेब नाटकर, मुकुंद काळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सुभाष औटे, गुलाब औटे, परमेश्वर काळे, माजी सरपंच बबनराव ओटे, नारायण यादव, राजाभाऊ काळे, सुरेश काळे, नकुल औटे, हताम्रध्वज औटे, जिमुरध्वज औटे, श्रीनिवास काळे, महारुद्र काळे, भाऊसाहेब काळे, अशोक काळे, अभिषेक काळे, भारत काळे, महेश औटे, साईनाथ सुरवसे, विष्णू ठोसर, अशोक जाधव, गहणीनाथ शिंदे, अंगद सुपेकर, शिरु वारे, अशोक औटे, बाबूभाई सय्यद, राघू भोसले, प्रल्हाद राऊत, कल्याण धोत्रे, केशव कदम, अण्णासाहेब सुरवसे, देविदास जाधव, अमोल पवार, अमोल पानखडे, अंगद जाधव , रामनाथ यादव, शिवाजी काळे, कालिदास औटे सह चिखली , सुशी, साठेवाडी, कवडगाव येथील ग्रामस्थांसह आदी उपस्थित होते. यशस्वीतेसाठी स्व.माणिकराव काळे पाटील प्रतिष्ठानचे संस्थापक तथा ग्रा.पं.सदस्य वशिष्ट काळे पाटील, बबन काळे, बाळू भोसले, बाबू औटे, सुनील काळे, सतीश काळे, मंगेश काळे, अमर काळे, प्रशांत काळे, भारत काळे,

# पंचशील नगर भीमजयंतीची कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी अमरराजे गायकवाड तर सचिवपदी सुमेध सरवदे यांची निवड





बीड ।प्रतिनिधी

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी पंचशील नगरमध्ये भीमजयंतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्या आयोजनानिमित्त रविवार (दि.१६) रोजी सायं. बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत गेल्या वर्षीच्या जयंतीचा हिशोब देण्यात आला व नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी अमरराजे गायकवाड तर सचिवपदी सुमेध सरवदे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

मागील वर्षीचे अध्यक्ष ॲड.तेजस वडमारे व सचिव चेतन पवार यांनी गेल्या वर्षीचा हिशोब देवून पुढील बैठकीस सुरूवात केली. यामध्ये सर्वानुमते अध्यक्षपदी अमरराजे गायकवाड, उपाध्यक्ष अशोक जावळे, सचिव सुमेध सरवदे, कार्याध्यक्ष आनंद खेमाडे, सहसचिव सोमेश हिवराळे, कोषाध्यक्षपदी अभय गायसमुद्रे यांची निवड करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षपदी बौद्धाचार्य सदाशिव कांबळे हे होते. तर ॲड.राहुल मस्के, प्रमोद शिंदे, महेंद्र वडमारे, संजय मिसाळ, के.के.वडमारे, विकास डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पंचशील नगरमधील उपासक, उपासिका यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# श्री बंकटस्वामी महाविद्यालयात मोसंबी लागवड व संवर्धन मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

बीड / प्रतिनिधी

येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयातील आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने शेतकरी आणि विद्यार्थ्यांसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मोसंबी लागवड व संवर्धन या महत्त्वपूर्ण विषयावर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध मोसंबी उत्पादक शेतकरी डॉ.श्री.शंकर विनायक धांडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.या मार्गदर्शनात मोसंबी लागवडीच्या आधुनिक तंत्रज्ञानावर, योग्य जमिनीसंदर्भातील माहिती, खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, रोग आणि कीड नियंत्रण तसेच




बाजारपेठेतील संधी याविषयी सखोल चर्चा करण्यात आली. शेतकरी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभाग घेतला आणि आपले अनुभव व शंका उपस्थित करून माहिती घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे समन्वयक डॉ.सुनील त्रिभुवन यांनी उत्कृष्टरीत्या केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.शंकर शिवशेट्टे यांनी करत या उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट केले, तर आभार प्रदर्शन डॉ.मनोज कुमार नवशे यांनी केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोसंबी उत्पादनाच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळाली, तर विद्यार्थ्यांसाठीही हा उपक्रम प्रेरणादायी ठरला. महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी व मोसंबी उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# खा. बजरंग सोनवणे यांना डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाची ॲलर्जी आहे का?



## बीड रेल्वे स्थानकाला महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे यासाठी मी दोन वेळेस आमरण उपोषण केले

बीड / प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व आंबेडकरी समाजाने या मागणीला पाठिंबा दिला आणि हजारो लोक रस्त्यावर उतरले. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री यांनी दिलेले पत्र त्यांच्या फेसबुक अकाउंट वरती टाकले. बार्शी नाक्याला रेल्वे स्टेशनचा थांबा द्या, अर्थात बार्शी नाक्यावरती रेल्वे थांबली पाहिजे या संदर्भातील ते पत्र आहे. बजरंग सोनवणे यांनी पाठपुरावा करून बार्शी नाक्याला रेल्वे थांबली पाहिजे याची तजवीज केली. यामुळे बार्शी नाक्यावर राहणाऱ्या लोकांमध्ये आनंद पसरला, यासाठी आम्ही खासदारांचे स्वागतच करतो.

परंतु बीड रेल्वे स्टेशनला महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे यासाठी खासदारांनी कोणताही पत्रव्यवहार केंद्रीय रेल्वेमंत्री सोबत केला नाही, आणि जर तसा काही पत्रव्यवहार त्यांनी केला असेल तर त्यांनी तो फेसबुक वरती जाहीर करावा. निवडणुकीमध्ये राजकीय पक्षांना बौद्धांची मते पाहिजे असतात, एकदा निवडणूक झाली की बौद्धांकडे पाठ फिरवायची, ही सवय प्रस्थापित पक्षांना लागलेली आहे. खासदार बजरंग बप्पा सोनवणे याला अपवाद नाहीत.

खासदार साहेबांना आमची नम्र विनंती आहे की, जसा बार्शी नाक्यावरील थांब्याचा तुम्ही पाठपुरावा केला, तसाच पाठपुरावा बीड रेल्वे स्टेशनच्या नावाचा सुद्धा करावा. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यासाठी थोडे कष्ट घेऊन आपण केंद्रीय रेल्वेमंत्री सोबत पत्र व्यवहार करावा.

# शिवसेना शेतकऱ्यांच्या पाठीशी खबीरपणे उभा : सचिन मुळूक

बीड / प्रतिनिधी

शेतकऱ्यांसह वंचित घटकांच्या पाठीशी शिवसेना कायम खंबीरपणे उभी आहे. यामुळेच केज तालुक्यातील साबला, धर्माळा, उमरी येथील येथील शेतकऱ्यांचा वीज प्रश्न शिवसेनेच्या माध्यमांतून सोडवण्यात आला आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना कायम शेतकऱ्यांच्या पाठीशी उभी असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले. केज तालुक्यातील साबला, धर्माळा ,उमरी येथील शेतकरी वारंवार खंडित होणाऱ्या २० पुरवठ्याने त्रस्त झाले होते. त्यामुळे या तीनही गावातील शेतकऱ्यांना पाणी प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत होता. परिणामी पाण्याअभावी पिके करपली जात होती. या तीनही गावातील शेतकऱ्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्याशी



केज तालुक्यातील साबला, धर्माळा ,उमरी येथील १०० के.व्ही. च्या ४ डीपी चे लोकार्पण

संपर्क करून आपली व्यथा मांडली. जिल्हाप्रमुख मुळूक यांनी शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून साबला, धर्माळा ,उमरी या गावांसाठी शंभर केव्ही जनित्राची मंजुरी घेतली. यामुळे शिवसेनेच्या माध्यमातून १०० ज्ञ.ीं. चे धर्माळा गावात २ ऊझ. उमरी गावात १ ऊझ. साबला गावात १ ऊ.झ. चे लोकार्पण करून शेतकऱ्यांचा विजेचा प्रश्न मार्गी लावला. यावेळी जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, सहकारी जिल्हाप्रमुख स्वप्निल भैया गलधर, जिल्हा संघटक योगेश नवले ,केज तालुकाप्रमुख अण्णासाहेब पाटील, विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे, सह तीनही गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी याप्रसंगी उपस्थित होते. ग्रामस्थानी जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक, सहकारी जिल्हाप्रमुख स्वप्निल भैया गलधर व शिवसेनेचे आभार मानले


# ड प्रकाश कवठेकर यांनी दिले पाटोदा तालुक्यातील पत्रकारांना विमा संरक्षण आ सुरेश धस यांच्या हस्ते वाटप

पाटोदा/प्रतिनिधी

डोंगरकिन्ही जि प गटाचे सदस्य, बीड जिल्ह्यातील प्रतिथयश उद्योजक एक विश्वासपात्र बँक चालक ड प्रकाश कवठेकर यांनी आ सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त पाटोदा तालुक्यातील सर्व पत्रकारांना प्रत्येकी चार लाख विमा संरक्षण देऊन.आ सुरेश धस यांच्या हस्ते विम्याचे वाटप करण्यात आले. पाटोदा तालुक्यात विभागिय, स्थानिक दैनिकात व काही साप्ताहिकाचे काम करणारे पत्रकार आहेत.ते इमानेइतबारे जनहितासाठी पत्रकारीता करतात, अनेकदा बातम्या साठी हल्ला सहन



करावा लागतो.तर ग्रामीण भागात बातम्या संकलीत करताना अनेक अडचणी येतात.यासाठी पत्रकारांना विम्याचे संरक्षण नसते.हेच हेरुन पत्रकारांचे मित्र,जि प सदस्य, प्रतिथयश उद्योजक, विश्वासपात्र बँक चालक ड प्रकाश कवठेकर यांनी सर्व पत्रकारांना प्रत्येकी चार लाख व एकुण दोन कोटीचा विम्याचे संरक्षण दिले आहे.आ सुरेश धस यांच्या वाढदिवसानिमित्त पत्रकारांना हे विमा संरक्षण दिले आहे.याच विम्याचे वाटप अद्वैतचंद्र या निवासस्थानी आ सुरेश धस यांच्या हस्ते वाटप करण्यात आले याप्रसंगी ड प्रकाश कवठेकर, नायगाव चे माजी सरपंच शाहीद सय्यद ,पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा स्विय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे. ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष बबनराव उकांडे, व्हाईस ऑफ मिडियाचे पत्रकार अविराज पवार चंद्रकांत पवार,भाऊ साहेब पवार, दयानंद सोनवणे, अमीर शेख, विजय जाधव, अजिज शेख ,महेशर शेख भाजपा ता अ भागवत येवले, माजी सरपंच रविंद्र राजवण , सय्यद शफ्फु,बावणे बप्पा, पाटोदा नगरसेवक संतोष जाधव, अंमळनेर जि प गटातील नेते भाऊसाहेब भवर, नायगांव चे सरपंच संदीप कवठेकर , तेजस बँक संचालक श्री रामदास ठोसर सर , अंमळनेरचे सरपंच गोविंदशेठ गाडे.यांची उपस्थिती होती.



# ऐतिहासिक कारंजा टॉवर जवळ सिमेंटचे चार बाकडे ठेवले; आबालवृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला!

## गत वैभव प्राप्त होईपर्यंत लढा सुरूच राहील - एस.एम.युसूफ़, रमेश गंगाधरे

बीड / प्रतिनिधी

शहरातील ऐतिहासिक कारंजा टॉवर ची होत असलेली परवड व दुर्दशा आणि वयोवृद्धांची होत असलेली ससेहोलपट बघून त्यात तक्रार निवारण केंद्र सुरू करण्यात यावे तसेच तीन बाजूने वयोवृद्धांसाठी वट्टे बांधावे किंवा सिमेंटचे बाकडे ठेवावे अशी मागणी नुकतीच दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार आणि जिल्हा पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनातून मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी केली होती. ही बातमी प्रसिद्धी माध्यमातून प्रकाशित झाल्यानंतर कारंजा टॉवर जवळ सिमेंटचे चार बाकडे ठेवण्यात आले असून या बाकड्यांमुळे आता ज्येष्ठ वयोवृद्ध नागरिकांची सोय झाली असून येथे बाकडे ठेवता क्षणी वयोवृद्ध येऊन बसत आनंद घेत आहेत. कारंजा टॉवरला परिपूर्ण करून शासन-प्रशासनाने हा आनंद द्विगुणीत करावा. असे ज्येष्ठ वयोवृद्ध नागरिक बोलत आहेत.

गेल्या दहा वर्षांपासून ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या तीन बाजूचे वट्टे जमीनदोस्त झाल्याने आबाल वृद्धांना बसण्यासाठी जागा राहिली नव्हती. यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक कारंजा टॉवर समोर असलेल्या एका कापड दुकानाच्या पायऱ्यांवर बसत होते. दुपारनंतर येणारे सायं. दैनिके त्याच पायऱ्यांवर बसून वाचत होते. वयोवृद्धांचा हा नित्यक्रम पाहून कारंजा टॉवरच्या सभोवती पूर्वीसारखे वट्टे बांधणे किंवा सिमेंट बाकडे ठेवणे आवश्यक असल्याचे लक्षात आल्याने एस.एम.युसूफ़ आणि रमेशराव गंगाधरे यांनी याविषयी निवेदन दिले होते.

याविषयीचे वृत्त दिनांक १५ व १६ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रसिद्धी माध्यमातून प्रकाशित झाल्यानंतर दिनांक १६ फेब्रुवारी २०२५ रविवार रोजी येथे सिमेंटचे चार बाकडे ठेवण्यात आले आहे. यामुळे आबालवृद्धांची सोय झाली आहे. आता येथे विनापरवाना अनधिकृतपणे लावण्यात येणारे डिजिटल बॅनर लावण्यास बंदी घालावी. त्याची अंमलबजावणी करावी. इमारतीच्या चारही बाजूंनी लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे सुरू करावे. कचरा आणून टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी तसेच टॉवरच्या दक्षिण बाजूस जसे बाकडे ठेवण्यात आले तसेच पश्चिम व उत्तर बाजूस सुद्धा ठेवण्यात यावे. बंद करून ठेवलेले कारंजा टॉवर उघडून त्यात तक्रार निवारण केंद्र सुरू करावे. कारंजा टॉवरच्या इमारती समोर लावण्यात आलेले पाण्याचे कारंजे सुद्धा सुरू करणे आवश्यक आहे. शासन-प्रशासनाकडून कारंजा टॉवरला गत वैभव पुन्हा प्राप्त करून दिले जात नाही तोपर्यंत याविषयी लढा सुरूच राहील असे एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी म्हटले आहे.

# गेवराई पंचायत समितीच्या लांडे इंजिनिअर कडून घरकुलाचे बोगस हप्ते सोडण्याचा प्रकार खुलेआम सुरु

## गट विकास अधिकाऱ्याचा धाक नसल्यामुळे गेवराई पंचायत समितीचा बिहारची पंचायत समिती होत आहे का?

## एका घरकुल हप्त्याचा ५००० रुपयाचा रेट, ४०० ते ५०० घरकुल मंजुरी एवढ्या पैशात हिस्सेदारी कुणा कुणाची? एका लाभार्थ्यांनी दैनिक आरंभ सांगितले की, मी गावातल्या एका इंजिनीयर च्या दलाला पाच हजार रुपये दिले अजूनही हप्ता पडत नाही

## जिल्हाधिकारी साहेब यांनी नियमाला केराची टोपली दाखवणाऱ्या लांडे इंजिनियर वर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी होत आहे

तलवाडा / प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गोरगरिबांसाठी गरिबातल्या गरिबाला शेवटच्या माणसापर्यंत महत्त्वकांशी विविध नाव देऊ घरकुल योजना राबवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे मात्र ही योजना फक्त नावालाच शोभत असून अधिकारी मात्र मलिदा साठी कागदावरच कागदी घोडे नाचवत धन दांडग्याला याचा लाभ गाव पातळीवर दलाला मार्फत होताना दिसून येत असून गोरगरीब हा पंचायत समितीला चक्रा मारण्यातच अख्खे आयुष्य घालत असून दुसरीकडे मात्र दलाल हाताखाली धरून इंजिनीयर कुणाच्याही घराचा फोटो काढून पाच हजार रुपये घेऊन बिनधास्त बोगस लाभार्थ्यांचे बोगस घरकुल पैसे सोडत असून याकडे मात्र कुणाचेच लक्ष नसताना असा प्रकार सध्या गेवराई तालुक्यातील पाहायला मिळत असून गेवराई तालुक्यातील तलवाडा गावात विशाल लांडे इंजिनियर यांनी दलाला मार्फत एका घरकुलच्या हप्त्यासाठी पाच हजार रुपयांचा रेटच ठेवला असून असे बोगस कामाला खतपाणी मिळत असून याकडे गट विकास अधिकारी बळ देत आहेत का असा प्रश्न पडत असून याकडे आता जिल्हाधिकारी साहेबांनी जातीने लक्ष देऊन गोरगरिबाला न्याय देण्याची मागणी होताना दिसून येत आहे

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई येथील पंचायत समिती ही दलालाचा अड्डा बनलेला असून तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत मोदी आवास योजनेचे चालू वर्षात ९२ घरकुल मंजुरी ग्रामपंचायत मार्फत प्रस्ताव पाठवण्यात आलेला होता मोदी आवास योजनेमध्ये ज्यांचे पक्के घरी आहेत अशा लोकांना दहा ते पंधरा हजार रुपये घेऊन लाभ देण्याचे काम करण्यात आले होते ९२ घरकुले मंजूर होऊन ऑनलाइन करण्यात आले होते काहींची पेमेंट ही सोडण्यात आले हे पेमेंट सोडण्यात येत असताना इंजिनिअर विशाल लांडे यांनी कुठल्याच घराची खातर जमा न करता गावातीलच




एका प्रतिष्ठित व्यक्ती दलाला कडून पाच पाच हजार रुपये चा रेट फिक्स करू कुणाचेही घरे दाखउन हप्ते सोडण्याचा प्रकार विशाल लांडे यांच्यामार्फत करण्यात आला असून गटविकास अधिकारी यांना वारंवार सांगून देखील अशा इंजिनियर वर कसल्याच प्रकारचे कारवाई होताना दिसून येत नसून हा सर्व प्रकार मलीद्याचा असल्याचा बोलले जात असून यामध्ये गोरगरिबाचे मरण आले असून इंजिनीयर विशाल लांडे दलाला मार्फत गपचूप घेऊन लपून छपून बोगस लाभार्थ्यांचे जिओ टॅग करून दुसरा हप्ता हा ७० ते ४५ हजार पर्यंत सोडण्याचा प्रकार हा दैनिक आरंभ न ऑनलाइन मार्फत उघडकीस आणला आहे तलवाडा गावात जी व्यक्ती बाहेरगावी असून त्याच व्यक्तीने गावात घरही न बांधता इंजिनियर लांडे यांनी टक्केवारी घेत संबंधित व्यक्तीच्या नावाने हप्ता सोडला असून शासनाच्या नियमाला केराची टोपली दाखवत गटविकास अधिकारी यांचा धाक नसल्यामुळे असे प्रकार घडत असून याकडे आता कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी यांनी स्वतः लक्ष देऊन अशा इंजिनियर वर कारवाई करण्याची मागणी होताना दिसून येत आहे

दैनिक आरंभ ने बातमी प्रकाशित करताच दैनिक आरंभचे तलवाडा प्रतिनिधी सुमेध करडे एका लाभार्थ्यांनी कॉल करून सांगितले की गावातीलच एका प्रतिष्ठित व्यक्तीने माझ्या मुलीची हळद असताना ७० हजार रुपये चा हफ्तमिळण्या साठी इंजिनियर ला ५००० रुपये द्यावे लागतील म्हणून मी बाहेर असताना माझ्या घरून पाच हजार रुपये घेऊन गेले आज दहा दिवस झाले असताना आणखीन देखील मला दुसरा हप्ता आला नाही घरकुल हा विषय आता पैसे कमवण्याचे साधन झाले असून असे दलाल ग्रामीण भागात तयार होताना दिसून येत आहे तरी अशा दलालणा आळा घालण्यासाठी काहीतरी उपाय योजना शासनामार्फत घेण्यात यावे अशीही मागणी होताना दिसून येत आहे

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT